# महाराष्ट्र विधानपरिषद

## तिसरे (हिवाळी) अधिवेशन, २०२५

---

## अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

## प्रश्नांची एकूण संख्या - २०

---

### महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजनेत दंत, आयुर्वेदिक आणि होमिओपॅथी उपचाराचा समावेश करणेबाबत

**(१) १३४ (२४-०४-२०२५) श्री.सत्यजीत तांबे :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र राज्यात प्रधानमंत्री जन आरोग्य योजनेसह महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजना दिनांक २३ सप्टेंबर, २०१८ रोजी वा त्यादरम्यान राबविण्यात येत असून दोन्ही योजनांमध्ये १६३२ आजारांवर उपचार करण्यात येत आहेत तथापि, सदर योजनेत दंत उपचाराचा समावेश नसल्यामुळे नागरिकांना खाजगी दंतवैद्याकडे दंत उपचारासाठी जावे लागत असल्याने त्यांचे आर्थिक नुकसान होत आहे,, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, दात हा मानवी शरीरातील महत्त्वपूर्ण घटक असल्यामुळे महात्मा फुले जीवनदायी आरोग्य योजनेत दंत उपचारांचा समावेश करण्यात यावा, तसेच आयुर्वेदिक आणि होमिओपॅथी उपचाराचा समावेश करण्यात यावा, अशी मागणी लोकप्रतिनिधी व विविध संघटनेने शासनाकडे वेळोवेळी केल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरील मागणी बाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(४) विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.प्रकाश आबिटकर (१७-१०-२०२५) :** (१) अंशत: खरे आहे.

विस्तारीत महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजना व प्रधानमंत्री जन आरोग्य योजनेंतर्गत लाभार्थ्यांसाठी दिनांक २८ जुलै,२०२३ रोजीच्या शासन निर्णयानुसार एकूण १३५६ उपचारांचा समावेश करण्यात आला आहे.

केंद्र शासनाच्या राष्ट्रीय आरोग्य प्राधिकरणाच्या सूचनांनुसार (Exclusion Policy) दंत उपचार योजनेत समाविष्ट नाहीत. सामान्यपणे दंत वैद्यकीय उपचार हे सौंदर्यवर्धक शल्यक्रियामध्ये (COSMETIC SURGERY) अंतर्भूत केले जात असल्याने या उपचारांचा समावेश आरोग्य संरक्षणात करण्यात येत नाही. तथापि, दातासंबंधित काही उपचार योजनेत समाविष्ट आहेत.ते खालीलप्रमाणे-Name of the procedure

- Benign tumour Of Mandible and Maxilla - Excision
- Benign tumour of Mandible and Maxilla - Excision with reconstruction
- Facial Bone Fractures (Closed or Compound) - Single (Faciomaxillary Injuries)
- Facial Bone Fractures (Closed or Compound) - Multiple (Faciomaxillary Injuries)

(२) व (३) अंशतः खरे आहे. अशा प्रकारची मागणी होत आहे. तथापि, आयुष्मान भारत - प्रधान मंत्री जन आरोग्य योजना व महात्मा जोतिराव फुले जन आरोग्य योजनेंतर्गत विषम चिकित्सेअंतर्गत(Allopathy)द्वितीय व तृतीय स्तरावरील (Secondary and Tertiary) उपचार पध्दतीचा समावेश केलेला आहे. आयुर्वेदिक व होमिओपॅथिक उपचार योजनेमध्ये समाविष्ट नाहीत.
केंद्र शासनाच्या राष्ट्रीय आरोग्य प्राधिकरणाच्या सूचनांनुसार (Exclusion Policy) दंत उपचार योजनेत समाविष्ट नाहीत.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्यातील आयुष्यमान भारत योजनेंतर्गत सेवा न देणाऱ्या रुग्णांलयावर कारवाई करणेबाबत

**(२) ३७८ (२४-०४-२०२५) श्रीमती चित्रा वाघ, श्री.विक्रांत पाटील :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) आयुष्यमान भारत कार्ड अंतर्गत पाच लाखापर्यंतच्या सर्जरी किंवा वैद्यकीय सुविधा या मोफत मिळणे अपेक्षित आहे परंतु बऱ्याच ठिकाणी आयुष्यमान भारत कार्ड असूनही अनेक रुग्णालयात रुग्णांना सदर योजनेचा लाभ देत नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, आयुषमान भारत कार्ड या योजनेमध्ये आता पर्यंत किती रुग्णालये शासनाच्या पॅनेलवर आहेत तसेच उक्त योजनेत समाविष्ट असलेल्या रुग्णालयांमध्ये सदर योजनेच्या लाभार्थ्यांना लाभ देत नसलेली रुग्णालयांची संख्या किती आहे,
(३) असल्यास, आयुष्यमान भारत लाभार्थ्यांना लाभ न देणाऱ्या रुग्णालयांवर शासनाने कोणती कारवाई केली आहे तसेच राज्यातील इतर रुग्णालये पॅनलवर घेण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.प्रकाश आबिटकर (१७-१०-२०२५) :** (१) हे खरे नाही,
(२) व (३) महाराष्ट्र्र राज्यात आयुष्मान भारत-प्रधानमंत्री जन आरोग्य योजना व महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजना एकत्रितपणे राबविण्यात येते. आयुष्यमान भारत व महात्मा ज्योतिराव फुले योजनेसाठी दिनांक ३०/०५/२०२५ पर्यंत एकूण २०५७ (शासकीय ६७१ व खाजगी १३८६) रुग्णालये अंगीकृत (Empanelled) आहेत. या योजनेंतर्गत महाराष्ट्र्र राज्यातील अधिवासी सर्व शिधापत्रिकाधारकांना या योजनेच्या लाभ देण्यात येतो.

एकत्रित आयुष्मान भारत-प्रधानमंत्री जन आरोग्य योजना व महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजनेचा लाभ न देणाऱ्या अंगीकृत रूग्णालयाला प्रथम अंमलबजावणी सहाय्य संस्थेमार्फत कारणे द्या नोटीस देण्यात येत असून रूग्णालयाकडून स्पष्टीकरण मागविण्यात येते, स्पष्टीकरण असमाधानकारक असल्यास रूग्णालयाची तक्रार पुढील कार्यवाही करीता समन्वय, अंगीकरण व शिस्तपालन समितीच्या बैठकीमध्ये ठेवण्यात येते. असमाधानकारक कामगिरी एकूण ६११ रूग्णालयांपैकी २९९ रूग्णालयांचे अंगीकरण रद्द करण्यात आले आहे.

रूग्णांना नजिकच्या रूग्णालयात योजनेचा लाभ घेता यावा, यासाठी जिल्हानिहाय रुग्णालय अंगीकरणाची उद्दिष्टे जिल्हाधिकारी यांना कळविण्यात आली असून, त्यानुसार राज्यात अधिकची २३८८ रुग्णालये योजनेअंतर्गत अंगीकृत करण्याचे प्रस्तावित आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## महात्मा ज्योतिराव फुले जनआरोग्य योजनेतील कागदपत्रांच्या जाचक अटी रद्द करण्याबाबत

**(३) १०२१ (२४-०४-२०२५) श्री.विक्रांत पाटील :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील सर्वच नागरिकांना महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजनेत समाविष्ट केले असतानाही या योजनेच्या पॅनलेवर असलेल्या रुग्णालयात उपचारार्थ रुग्णाला दाखल केले असता सदर रुग्णांकडून व त्यांच्या नातेवाईकांकडून उक्त योजनेचा लाभ मिळण्याकरीता आवश्यक असणारी कागदपत्रे उदा. शिधापत्रिका, तहसिल कार्यालयातील रहिवाशी दाखला, आधारकार्ड इत्यादी अनेक कागदपत्रे मागितली जात असून कागदपत्रांची पूर्तता करण्यासाठी वेळ लागत असल्याने रुग्णांना वेळेवर उपचार उपलब्ध होत नसून अनेक रुग्णांना या योजनेपासून वंचित रहावे लागत असल्याचे माहे ऑक्टोबर, २०२४ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(२) असल्यास, राज्यातील सर्व नागरिकांना या योजनेचा लाभ सुरळीत मिळावा याकरीता शासनाने कागदपत्राच्या जाचक अटी रद्द करुन त्यांना देण्यात आलेल्या कार्डच्या वा संबंधित कागदपत्रांच्या आधारे उपचार मिळण्याकरीता शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.प्रकाश आबिटकर (१७-१०-२०२५) :** (१) व (२) हे खरे नाही,
सार्वजनिक आरोग्य विभागाचे शासन निर्णय क्र. मफुयो-२०२३/प्र.क्र.१६०/आरोग्य-६, दिनांक २८जुलै,२०२३ नुसार योजनेंतर्गत प्रतिकुटुंब प्रति वर्ष ५.०० लाखांचे संरक्षण अनुज्ञेय आहे. आयुष्मान कार्ड किंवा शिधापत्रिकेच्या आधारे रूग्णाची नोंदणी केली जाते. शिधापत्रिका नसल्यास अधिवास प्रमाणपत्र आणि आधार कार्ड ही कागदपत्रे आवश्यक आहेत. सदरची किमान कागदपत्रे प्राप्त झाल्यावर पात्र लाभार्थी रुग्णास निश्चितच योजनेचे लाभ दिले जाऊ शकतात.
तथापि,आपातकालीन परिस्थितीत कोणत्याही प्रकारची कागदपत्रे उपलब्ध नसल्यास ETI (Emergency Telephonic Intimation) ची सुविधा आहे. या परिस्थितीत ५ दिवसांच्या मुदतीत कागदपत्रांची पूर्तता केली जाऊ शकते.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्यात समूह शाळा योजना आणि शाळा दत्तक योजना या दोन्ही योजना मराठी माध्यमाच्या शिक्षणावर अन्याय करणाऱ्या असल्याबाबत

**(४) १२३३ (२४-०४-२०२५) श्री.सदाशिव खोत, डॉ.परिणय फुके, श्रीमती उमा खापरे, ॲड.निरंजन डावखरे, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, श्री.विक्रांत पाटील :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात शालेय शिक्षण विभागाने समुह शाळा योजना आणि दत्तक शाळा योजनांबाबतचा शासन निर्णय यापूर्वी जारी केला असल्याने उपेक्षित, वंचित मुलांच्या शिक्षणाचा प्रश्न गंभीर होणार असल्याचे मा.मुख्यमंत्री, मा.मंत्री. शालेय शिक्षण विभाग, सचिव शालेय शिक्षण विभाग यांच्याकडे समर्थन संस्थेने दिनांक २४ जानेवारी, २०२५ रोजीच्या पत्राद्वारे निदर्शनास आणली आहे. हे खरे आहे काय,

(२) असल्यास, समूह शाळा योजना आणि दत्तक शाळा योजना या दोन्ही योजना मराठी माध्यमाच्या शिक्षणावर आणि पर्यायाने मराठी भाषेवर अन्याय करणाऱ्या असल्याने सदर योजनांना कडाडून विरोध होत असून सदर शासन निर्णय रद्द करण्याची मागणी होत असल्याचे माहे जानेवारी,२०२५ च्या दुसऱ्या आठवड्यात वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास असल्यास, उक्त योजना राबविण्यासाठी शालेय शिक्षण विभागाच्या १०० दिवसांचा आराखडा माहे जानेवारी, २०२५ मध्ये शासनास सादर करण्यात आला असून उक्त आराखड्यात कोणकोणत्या गोष्टीचा समावेश करण्यात आलेला आहे तसेच सदर आराखडा (रोड मॅप) जाहीर करण्याआधी आपण सर्वांशी चर्चा करणार असल्याचे मा.शालेय शिक्षण मंत्री महोदयांनी घोषणा केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, मराठी भाषेला अभिजात दर्जा मिळाला आहे मात्र समूह शाळा योजना आणि शाळा दत्तक शाळा योजनेचा समावेश असल्याने १० पेक्षा कमी पटसंख्या असलेल्या शाळा बंद होणार असल्याने दुर्गम आणि वस्तीशाळेत शिकणाऱ्या विद्यार्थ्यांची मोठ्या प्रमाणात गैरसोय होणार आहे. तसेच दहापेक्षा कमी पटसंख्या असलेल्या शाळांमध्ये कंत्राटी शिक्षकांची नेमणूक केल्यामुळे शिक्षण व्यवस्थेवर विपरित परिणाम होत आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, समूह शाळा योजना आणि दत्तक शाळा योजना या दोन्ही योजना मराठी माध्यमाच्या शिक्षणावर आणि पर्यायाने मराठी भाषेवर अन्याय करणाऱ्या असल्याने सदर शासन निर्णय रद्द करण्याबाबत कोणती कार्यवाही / उपाययोजना केली आहे वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दादाजी भुसे (१९-११-२०२५) :** (१) अशा आशयाचे निवेदन प्राप्त झाले आहे. समुह शाळा योजनेबाबत शासनाने कोणताही शासन निर्णय निर्गमित केलेला नाही.

(२) हे खरे नाही.

राज्यातील शहरी व ग्रामीण भागामध्ये समाजातील दानशूर व्यक्ती, स्वयंसेवी संस्था, कॉर्पोरेट ऑफिसेस यांच्या सहयोगाने पायाभूत सुविधा व आवश्यक संसाधनाची उपलब्धता सुनिश्चित करुन त्या माध्यमातून गुणवत्तापूर्ण व दर्जेदार शिक्षणाच्या प्रसारासाठी शाळा दत्तक योजना राबविण्याबाबत दिनांक १८/०९/२०२३ रोजी शासन निर्णय घेण्यात आला आहे. सदर शासन निर्णय केवळ शासकीय व स्थानिक

स्वराज्य संस्थांच्या अधिनस्त असलेल्या सर्व माध्यमांच्या शाळांसाठी लागू आहे. त्यामुळे या योजनेमुळे मराठी माध्यमाच्या शिक्षणावर अथवा मराठी भाषेवर अन्याय होण्याची बाब नाही. १० पेक्षा कमी पटसंख्या असलेल्या शाळा तसेच मराठी शाळा बंद होण्याचा प्रश्न उद्भवत नाही.
(३), (४) व (५) शालेय शिक्षणाच्या संदर्भात गुणवत्तापूर्ण शिक्षण व इतर बाबींचा आराखडा तयार करण्यासाठी मा.मंत्री (शालेय शिक्षण) यांच्या उपस्थितीत दिनांक ०५/०१/२०२५ रोजी संघटनांसोबत तर दिनांक ०६/०१/२०२५ रोजी संस्था चालकांबरोबर प्रदिर्घ चर्चासत्र आयोजित करण्यात आले होते.

राज्य शासनाने १०० दिवसांच्या कालावधीमध्ये हाती घ्यावयाच्या महत्त्वाच्या योजनांचा कृति आराखडा यामध्ये राष्ट्रीय शैक्षणिक धोरण लागू करण्यासाठी राज्यातील सर्व शाळांचे छायाचित्रासह जिओटॅगिंग, राज्य अभ्यासक्रम आराखडा (पायाभूत स्तर) ची अंमलबजावणी व एनसीईआरटी पुस्तके लागू करणे, शालेय गुणवत्ता मूल्यांकन आणि श्रेणी फ्रेमवर्क ची अंमलबजावणी, कॉपीमुक्त अभियान, आनंददायी शिक्षणासाठी नाविन्यपूर्ण अध्ययन व अध्यापन तंत्राचा वापर, अभ्यासू पालक, शिक्षक, शैक्षणिक संस्था व शिक्षणतज्ज्ञ यांच्या शिफारशी विचारात घेऊन शैक्षणिक धोरणाची आखणी करणे, महाराष्ट्र राज्याचे राज्य गीत "गर्जा महाराष्ट्र माझा" ची राज्यातील सर्व मंडळाच्या व माध्यमाच्या शाळांमध्ये सक्तीचे व मराठी भाषा विषय सक्तीचा करण्याबाबत प्रभावी अंमलबजावणी, शाळांनी भौत्तिक सुविधा, शैक्षणिक दर्जा व निकषांच्या आाधारे स्वयंमुल्यमापन करण्याकरीता SQAAF पोर्टल विकसित करुन सर्व शाळा पोर्टलला जोडणे व त्याआधारे शाळांचे रँकिंग करणे, शाळा व्यवस्थापन समितीचे पुनर्गठन व बळकटीकरण,

विद्यार्थी केंद्रीत गुणवत्तापूर्ण व आनंददायी शिक्षण, शासकीय शाळांचा विविध योजनांद्वारे विकास, विद्यार्थ्यांमध्ये उत्तम आरोग्य, व्यक्तिगत व सार्वजनिक स्वच्छताबाबत सजगता निर्माण करणे इत्यादी मुद्द्यांचा समावेश करण्यात आला आहे.
(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

## येवला (जि.नाशिक) नगरपरिषद क्षेत्रातील अल्पसंख्याक बहुल नागरी क्षेत्रात क्षेत्रविकास कार्यक्रम राबविण्यासाठी अनुदान वितरीत करण्याबाबत

**(५) १७२१ (२४-०४-२०२५) श्री.पंकज भुजबळ :** सन्माननीय **अल्पसंख्यांक विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) येवला (जि.नाशिक) नगरपरिषद क्षेत्रातील अल्पसंख्याक बहुल नागरी क्षेत्रात क्षेत्रविकास कार्यक्रम राबविण्यासाठी असलेल्या योजनेमधून पूर्ण झालेल्या कामांसाठी अनुदान वितरीत करण्याची जिल्हाधिकारी नाशिक व स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी दिनांक २३ डिसेंबर, २०२४ रोजी वा त्या सुमारास मा.मंत्री अल्पसंख्याक विकास यांना निवेदन देऊन मागणी केलेली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, येवला जि.नाशिक नगरपरिषद क्षेत्रातील अल्पसंख्याक बहुल नागरी क्षेत्रात क्षेत्रविकास कार्यक्रम राबविण्यासाठी असलेल्या योजनेमधून पूर्ण झालेल्या कामांसाठी अनुदान वितरीत करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**ॲड. माणिकराव कोकाटे (१३-११-२०२५) :** (१) हे खरे आहे.
(२) जिल्हाधिकारी कार्यालय, नाशिक यांनी सादर केलेल्या प्रस्तावानुसार अल्पसंख्याक बहुल नागरी क्षेत्रविकास योजनेंतर्गत सन २०२४-२५ या आर्थिक वर्षात अर्थसंकल्पित निधीपैकी उपलब्ध निधीमधून शासन निर्णय दिनांक ३० मार्च, २०२५ अन्वये रुपये १.४८कोटी इतका निधी वितरित करण्यात आलेला आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## मौजे बोरखेडा (ता.मुक्ताईनगर, जि.जळगाव) येथील ग्रामपंचायतीचे विभाजन करुन नवीन ग्रामपंचायत निर्माण करण्याबाबत

**(६) १७३५ (२४-०४-२०२५) श्री.एकनाथराव खडसे :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मौजे बोरखेडा (ता.मुक्ताईनगर, जि.जळगाव) येथील ग्रामपंचायतीचे विभाजन करून बोरखेडा व मोरझिरा अशा दोन ग्रामपंचायती निर्माण करण्याबाबतचा प्रस्ताव शासनाकडे पाठविण्यात आला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर प्रस्ताव मंजूर होण्याकरीता शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.जयकुमार गोरे (१७-१०-२०२५) :** (१) होय.
(२) सदर प्रस्तावाच्या अनुषंगाने दिनांक ११ ऑगस्ट २०२५ रोजी मौजे बोरखेडा (ता.मुक्ताईनगर, जि.जळगाव) येथील ग्रामपंचायतीचे विभाजन करुन बोरखेडा व मोरझिरा (बोरखेडा नवेसह) या स्वतंत्र ग्रामपंचायत स्थापन करण्याबाबतची अधिसुचना प्रकाशित करण्यात आलेली आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्यातील उच्च महाविद्यालयांचा 'कायम' शब्द वगळणेबाबत

**(७) २७२० (१८-०७-२०२५) श्री.जयंत आसगावकर, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.अभिजित वंजारी, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.राजेश राठोड, डॉ.प्रज्ञा सातव, श्री.धीरज लिंगाडे, श्री.विक्रम काळे, श्री.सतिश चव्हाण, श्री.किरण सरनाईक, श्री.अमोल मिटकरी :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) शासनाने सन २००१ मध्ये प्राथमिक, माध्यमिक, उच्च माध्यमिक व उच्च महाविद्यालय स्तरावरील शाळा, महाविद्यालयांसाठी 'कायम' विनाअनुदानित तत्व अवलंबिले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सन २०१२ मध्ये प्राथमिक, माध्यमिक, उच्च माध्यमिक स्तरावरील शाळा, महाविद्यालयांचा 'कायम' शब्द काढून टाकण्यास नागपूर खंडपीठाने या उच्च महाविद्यालयांचा 'कायम' शब्द काढण्याचा निर्णय दिला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, कायम विनाअनुदान तत्वावर परवानगी दिलेल्या अशासकीय वरिष्ठ महाविद्यालयांचा कायम शब्द काढून टाकून त्यांना अनुदानासाठी पात्र करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रकांत (दादा) बच्चू पाटील (१४-११-२०२५) :** (१) होय, हे खरे आहे.

दिनांक १७/०५/२००१ रोजीच्या मंत्रिमंडळ उपसमितीचा निर्णय व दिनांक २४/११/२००१ रोजीच्या मंत्रिमंडळ निर्णयानुसार शैक्षणिक वर्ष २००१ पासून नवीन महाविद्यालये / विषय / अभ्यासक्रम / विद्याशाखा / अतिरिक्त तुकड्या यांना कायम स्वरुपी विनाअनुदानित तत्वावर मंजूरी देण्याचे धोरण अवलंबविण्यात येत आहे.
(२) आर.टी.ई. कायद्यानुसार राज्यातील सहा ते चौदा वयोगटातील मुलांना मोफत शिक्षण देणे ही राज्य शासनाची जबाबदारी असल्याची बाब विचारात घेऊन, शालेय शिक्षण व क्रिडा विभागाने, शासन निर्णय दिनांक २६/०२/२०१४ अन्वये उच्च माध्यमिक शाळा/ कनिष्ठ महाविद्यालये व वर्ग/ तुकड्या यांचा कायम शब्द वगळून त्यांना अनुदानावर आणण्याचे धोरण मा.मंत्रिमंडळाच्या मान्यतेने निश्चित केले आहे.
रिट याचिका क्र.४१२०/२०१९ मध्ये मा.उच्च न्यायालय मुंबई, खंडपीठ नागपूर यांनी दिनांक २७/०६/२०२२ रोजीच्या आदेशान्वये महाविद्यालयांच्या अनुदानाबाबत "कायम" शब्द वगळण्याबाबत निर्णय दिलेला नाही. मा.उच्च न्यायालयाने सदर आदेशात, राज्याची आर्थिक परिस्थिती व अन्य संबंधित बाबी विचारात घेऊन, राज्य शासन भविष्यात अनुदान देणेबाबत धोरण ठरवू शकते, असे नमूद केले आहे. ("on permanent no grant basis" would only mean that there is no denial of no grant permanently and there is a possibility of making available grants in future in accordance with the law and the policy that may be formulated by the State Government on improvement of the State's financial condition and other relevant circumstances.)
(३) व (४) सद्य:स्थितीत सन २००१ पासून कायम विना अनुदान तत्वाचे धोरण अवलंबविण्यात येत आहे. सदर धोरणामध्ये बदल करून, कायम विनाअनुदानित तत्वावरील अशासकीय वरिष्ठ महाविद्यालयांच्या नावातील "कायम" शब्द वगळून त्यांना अनुदानासाठी पात्र करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन नाही.

---

## राज्याच्या नोंदणी मुद्रांक शुल्क विभागाने दस्तांच्या पानांच्या हाताळणी शुल्कात दुपटीने वाढ केल्याबाबत

**(८) २७९६ (१०-०७-२०२५) अ‍ॅड.अनिल परब :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) शासनाच्या नोंदणी व मुद्रांक शुल्क विभागाने दस्त नोंदणीच्या प्रक्रियेत लागणाऱ्या पानांच्या हाताळणी शुल्कात दुपटीने वाढ करण्याच्या घेतलेल्या निर्णयानुसार हाताळणी शुल्क २० रुपयेवरून ४० रुपये प्रतिपान करण्यात आल्यामुळे दस्त नोंदणीकरीता नागरिकांना अतिरिक्त आर्थिक भार सहन करावा लागणार असल्याचे माहे एप्रिल, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर दस्त नोंदणीच्या प्रक्रियेत लागणाऱ्या पानांच्या हाताळणी शुल्कवाढीच्या निर्णयाबाबत फेरविचार करण्याच्यादृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रशेखर बावनकुळे (१८-०७-२०२५) :** (१) हे अंशत: खरे आहे.
(२) सन २००१ पासून आजपर्यंत संगणकीकरणाच्या हार्डवेअर व त्याची देखभाल,मनुष्यबळ आणि कझ्युमेबल्स या बाबीच्या दरात वाढ झाली असल्याने वाढीव खर्च भागविण्याकरीता दस्त हाताळणी शुल्कामध्ये वाढ करुन ते रुपये ४०/इतके निश्चित करण्यात आले आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## वैद्यकीय शिक्षण संचालनालयातील नवीन पदे निर्माण करणाऱ्या प्रस्तावास मान्यता मिळणेबाबत

**(९) ३२४८ (१०-०७-२०२५) श्री.अरुण लाड :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) वैद्यकीय शिक्षण संचालनालयामार्फत वैद्यकीय महाविद्यालयाच्या कामकाजावर नियंत्रण ठेवण्यात येत असून वैद्यकीय महाविद्यालयात हंगामी संचालक, हंगामी सहसंचालक यांच्या व्यतिरिक्त एकही पद निर्माण करण्यात आलेले नसल्याची बाब माहे मे, २०२५ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, आरोग्य विभागाला संचालक, अतिरिक्त संचालक, उपसंचालक तसेच सहाय्यक संचालक अशी साडेतीनशे पदे निर्माण करण्यात आली आहेत मात्र वैद्यकीय शिक्षण विभागात अशी पदे निर्माण न केल्यामुळे वैद्यकीय शिक्षण विभागाचा बोजवारा उडाला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, वैद्यकीय महाविद्यालयाची राज्यात वाढती संख्या लक्षात घेऊन संचालनालयाच्या विस्ताराचा प्रस्ताव तत्कालीन वैद्यकीय शिक्षण संचालकांनी तयार केला मात्र त्यास अद्याप मान्यता मिळाली नाही, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रस्ताव मंजूर करण्यासाठी शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे काय,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.हसन मुश्रीफ (३०-०९-२०२५) :** (१) हे खरे नाही.
(२) हे खरे नाही.
(३) वैद्यकीय महाविद्यालयाची राज्यात वाढती संख्या लक्षात घेऊन संचालनालयाच्या विस्ताराबाबत वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभागाच्या दिनांक ०६/१०/२०२१ रोजीच्या शासन निर्णयान्वये वैद्यकीय शिक्षण व संशोधन, संचालनालय, मुंबई यांच्या आस्थापनेवर १९ व २ नविन प्रादेशिक कार्यालयांसाठी

(नागपूर व छत्रपती संभाजीनगर) २२ अशी एकूण ४१ नविन पदे निर्माण करण्यांस व अनुक्रमे १४ व ०६ अशा एकूण २० मनुष्यबळसंख्येच्या प्रमाणात सेवा बाह्ययंत्रणेद्वारे घेण्यांस मान्यता प्रदान करण्यात आलेली आहे.

(४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## अल्पसंख्यांक विभागातील रिक्त पदे भरण्याबाबत

**(१०) ३३४५ (१८-०७-२०२५) श्री.रणजितसिंह मोहिते-पाटील :** सन्माननीय **अल्पसंख्यांक विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्याचा अल्पसंख्याक विभाग व अल्पसंख्याक आयुक्तालय,अल्पसंख्याक प्रशिक्षण व संशोधन संस्था,अल्पसंख्याक आयोग, वक्फ महामंडळ,पंजाबी साहित्य अकादमी, मौलाना आझाद मंडळ,जैन महामंडळ व विभागाची क्षेत्रिय कार्यालये यासाठी एकूण ६०९ पदे मंजूर असल्याचे माहे मे,२०२५ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अल्पसंख्याक विभागातील मंजूर ६०९ पदांपैकी ४१० म्हणजेच ६७% पदे रिक्त असून सदर रिक्त पदे शासन आदेश होऊनही भरली गेली नाहीत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त ४१० रिक्त पदे भरण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**ॲड. माणिकराव कोकाटे (१८-११-२०२५) :** (१) राज्याचा अल्पसंख्याक विभाग व अल्पसंख्याक आयुक्तालय, अल्पसंख्याक प्रशिक्षण व संशोधन संस्था, अल्पसंख्याक आयोग, वक्फ महामंडळ, पंजाबी साहित्य अकादमी, मौलाना आझाद मंडळ, जैन महामंडळ व विभागाची क्षेत्रिय कार्यालये यासाठी एकूण ६१२ पदे मंजूर आहेत.

(२) होय, ६१२ पदांपैकी ४११ पदे रिक्त आहेत.

(३) रिक्त पदे भरण्याकरीता शासन स्तरावर कार्यवाही करण्यात येत आहे. नवनिर्मित पदांचे सेवाप्रवेश नियम निर्मिती अंतिम टप्प्यात आली आहे.आवश्यकतेनुसार पदे भरण्याकरीता प्रतिनियुक्तीचे धोरण अवलंबिण्यात येत आहे. महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडे पद भरती करीता पाठपुरावा करण्यात येत आहे. वर्ग ३ व ४ ची पदे कंत्राटी पध्दतीने बाह्य यंत्रणेद्वारे भरण्यात येत आहेत.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## ग्रामीण भागातील पाणीपुरवठा देयके माफ करण्याबाबत

**(११) ३९८७ (१७-०७-२०२०) श्री.सदाशिव खोत :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात लॉकडाऊनमुळे ग्रामीण अर्थव्यवस्था पूर्णतः ढासळलेली असल्याचे निदर्शनास आले असून ग्रामीण भागात घर टॅक्स, पाणीपुरवठा देयके भरली जात नसून ग्रामपंचायतीला महावितरणकडून वीज देयक न भरल्यास पाणीपुरवठ्याचे वीज कनेक्शन बंद करण्यात येईल अशा सूचना देण्यात आल्या आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सन २०१८-२०१९ मध्ये तत्कालीन शासनाने दुष्काळी गावातील पाणीपुरवठ्याचे वीज बिल माफ केले असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने ग्रामीण भागातील घर टॅक्स व पाणीपुरवठा देयक माफ करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.जयकुमार गोरे (२५-०८-२०२५) :** (१) लॉकडाऊन काळात कुठल्याही ग्राहकाचा वीजपुरवठा खंडीत करण्याबद्यलच्या सूचना महावितरण कंपनीमार्फत देण्यात आलेल्या नव्हत्या.
(२) हे खरे नाही.
(३) मदत व पुनर्वसन शासन निर्णय दिनांक ११/१२/२०१८ अन्वये दुष्काळ भागातील शहरी व ग्रामीण नळ पाणीपुरवठा योजनांची थकीत विद्युत देयकांच्या मुद्यलापैकी ५% रक्कम व माहे नोव्हेंबर२०१८ ते जून २०१९ या ८ महिन्याच्या कालावधीतील शहरी व ग्रामीण नळ पाणीपुरवठा योजनांची चालू विद्युत देयके मदत व पुनर्वसन विभागाच्या टंचाई निधीमधुन अदा करण्यास शासनाने मंजूरी दिलेली आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## बेल्हारा तांडा (ता.आर्वी, जि.वर्धा) येथील काशीफाटा येथे नवीन तलावाची निर्मिती करुन सिंचनाची सोय उपलब्ध करणेबाबत

**(१२) ४०५० (१५-०७-२०२५) श्री.दादाराव केचे :** सन्माननीय **मृद व जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मौजा बेल्हारा तांडा (ता.आर्वी, जि.वर्धा) येथील काशीफाटा येथे नवीन तलावाची निर्मिती करणेबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी मा.मंत्री मृद व जलसंधारण यांच्याकडे दिनांक २६ मे, २०२५ रोजी वा त्यादरम्यान निवेदनाद्वारे केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, अनेक वर्षापासून या भागातील शेतकऱ्यांची तलावाची मागणी असून अधिकाऱ्यांच्या मनमानी धोरणामुळे शेतकरी सिंचनापासून वंचित आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर भागातील शेतकऱ्यांना सिंचनाची सोय उपलब्ध होण्याच्या दृष्टीने नवीन तलावाची निर्मिती करण्याकरीता शासनाकडून कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.संजय राठोड (१६-१०-२०२५) :** (१) हे खरे नाही.
(२) हे खरे नाही.
(३) कार्यकारी अभियंता, पाटबंधारे व जलविद्युत प्रकल्प अन्वेषण विभाग, नागपूर यांच्या सदर तलावाच्या मानचित्र अभ्यास अहवालाच्या निष्कर्षामध्ये

"प्रस्तावित [(बेल्हारा तांडा) काशीफाटा] प्रकल्प हा धाम नदीच्या उप नाल्यावरील समादेश क्षेत्रात येत असून वर्धा खोऱ्यातील वेणा उपखोऱ्यात मोडत असल्याचे निष्पन्न झाले आहे. तथापि, सदर खोऱ्यामधील वेणा नदीवर प्रस्तावित असलेला मनगाव बॅरेज व उपसा सिंचन योजनेचे पाणी उपलब्ध

प्रस्ताव सादर केले असता त्यात २३ द.ल.घ.मी.ची तुट निदर्शनास आली असल्याने पाण्याअभावी या भागात कुठलाही नवीन प्रकल्प प्रस्तावित करणे उचित ठरणार नाही.” असे नमूद केले आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## पालघर व वसई (जि.पालघर) तालुक्यांमधील आदिवासी भागातील कर्मचाऱ्यांच्या बदल्या गैरमार्गाने केल्याबाबत

**(१३) ४६२३ (१७-०७-२०२५) श्री.धीरज लिंगाडे :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) जिल्हा परिषद कर्मचाऱ्यांच्या वर्ग-३ व वर्ग-४ या वर्गातील कर्मचाऱ्यांच्या बदल्यासंदर्भात शासनाने दिनांक १५ मे, २०२४ रोजी शासन निर्णय निर्गमित केला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर शासन निर्णयातील प्रकरण (२) नुसार आदिवासी / नक्षलग्रस्त भागातील प्रशासकीय बदली प्राप्त कर्मचाऱ्यांच्या त्या तालुक्यात बदली न करण्याची विनंती केल्यास अशा कर्मचाऱ्यांची बदली करण्यात न येता त्यांची बदली वगळण्यात यावी, असे नमूद करण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, असे असताना दिनांक १५ मे, २०२४ च्या शासन निर्णयानुसार पालघर जिल्हा परिषद अंतर्गत सन २०२५-२६ मध्ये झालेल्या बदल्यांप्रकरणी पालघर व वसई तालुक्यामधील आदिवासी भागातील कर्मचाऱ्यांना बदली नाकारण्याचा अधिकार देण्यात आला नसल्याचे तसेच सदर बदल्या गैरमार्गाने केल्या असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(४) असल्यास, शासन निर्णयाची पायमल्ली केल्याबाबत संबंधित अधिकाऱ्यांविरुध्द शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे ?

**श्री.जयकुमार गोरे (१७-१०-२०२५) :** (१) सदर शासन निर्णय हा दिनांक १५ मे, २०१४ रोजी निर्गमित करण्यात आलेला आहे.
(२) शासन निर्णय दिनांक १५/०५/२०१४ च्या प्रकरण-१ मधील अ.क्र.२ (४) मधील तरतुदीनुसार आदिवासी/नक्षलग्रस्त क्षेत्रातील बदली पात्र कर्मचाऱ्याने त्याची त्या तालुक्यातून बदली न करण्याची विनंती केल्यास त्यास जिल्हास्तरीय बदलीतून वगळण्यात यावे. मात्र त्या कर्मचाऱ्याच्या प्रशासकीय बदलीबाबत गटविकास अधिकारी यांनी समुपदेशनांव्दारे तालुकांतर्गत बदलीची कार्यवाही करावी. अशा कर्मचाऱ्यास त्याच भागात/तालुक्यात इतरत्र ठिकाणी बदली द्यावी.
(३) हे खरे नाही. पालघर जिल्ह्यातील एकूण ८ तालुक्यापैकी ६ तालुके हे पेसा कार्यक्षेत्रात येतात. तर २ तालुके हे अंशत: पेसा क्षेत्रात येत आहेत. त्यामुळे बदल्या करताना पेसा क्षेत्रातील तालुक्यासाठी हा लाभ देण्यात आलेला आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्यातील शिक्षक कर्मचाऱ्यांना वैद्यकीय देयक प्रतीपूर्ती योजना लागू करणेबाबत

**(१४) १७३८० (२५-०३-२०२३) श्री.किशोर दराडे, श्री.विक्रम काळे : तारांकित प्रश्न क्रमांक १५७३२ ला दिनांक ३० डिसेंबर, २०२२ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील अंशत: अनुदानित म्हणजेच २०%, ४०%, ६० %, ८० % वेतन घेणाऱ्या शाळांना शालेय पोषण आहार योजना व पाठ्यपूस्तक योजना लागू केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या शाळांतील शिक्षक-कर्मचाऱ्यांना वैद्यकिय देयक प्रतिपुर्ती योजना लागू करण्याबाबत शासनस्तरावरुन कोणती उपाययोजना करण्यात आली आहे,वा येत आहे,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने शिक्षक व शाळेतील शिक्षक कर्मचाऱ्यांना वैद्यकिय देयक प्रतिपुर्ती योजना लागू करण्याबाबत शासनाने कोणती उपाययोजना /कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दादाजी भुसे (२९-०९-२०२५) :** (१) होय. हे खरे आहे. सोबत दिनांक १८/०८/२०१७ रोजीचा शासन निर्णय संलग्न केला आहे.
(२) व (३) शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, शासन निर्णय, दिनांक २०/०७/२००९ अन्वये राज्यातील कायम विनाअनुदान तत्वावर परवानगी दिलेल्या प्राथमिक व माध्यमिक शाळांना व तुकड्या १००% अनुदानावर आल्यानंतर त्यांना वेतनेतर अनुदान, पेन्शन, वैद्यकीय लाभ, अतिरिक्त तुकड्यांना अनुदान आदी बाबी प्रचलित नियम व धोरणानुसार अनुज्ञेय होतील, अशी तरतूद आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यात शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना जुनी पेन्शन योजना लागू करणेबाबत

**(१५) १९०८९ (०४-०८-२०२३) श्री.विक्रम काळे, श्री.शशिकांत शिंदे, श्री.सतिश चव्हाण, श्री.अमोल मिटकरी, श्री.धीरज लिंगाडे, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.अभिजित वंजारी, श्री.राजेश राठोड, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, डॉ.प्रज्ञा सातव, श्री.सुधाकर अडबाले, श्री.जयंत आसगावकर, श्री.किशोर दराडे, श्री.सत्यजीत तांबे, श्री.किरण सरनाईक, श्री.ज्ञानेश्वर म्हात्रे, ॲड.निरंजन डावखरे, श्रीमती उमा खापरे : तारांकित प्रश्न क्रमांक १७४११ ला दिनांक ६ मार्च, २०२३ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) शासकीय, निमशासकीय कर्मचारी आणि खाजगी मान्यताप्राप्त शाळा अंशत: अनुदानित, विनाअनुदानित किंवा अनुदानित शिक्षण संस्थांवर दिनांक १ नोव्हेंबर, २००५ पूर्वी नियुक्त झालेल्या व त्यानंतर १०० टक्के अनुदानावर आलेल्या शिक्षक/शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना जुनी पेंशन योजना लागू करण्याबाबत विविध शिक्षक संघटनांनी शासनाकडे वारंवार निवेदने दिली असून याबाबत सर्वोच्च नायालयाने निदेश देऊनही शासनाने अद्यापही निर्णय घेतला नाही हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शासकीय, निमशासकीय, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी यांनी समन्वय समितीच्या नेतृत्वाखाली राज्यातील १७ लाख कर्मचारी शिक्षकांनी दिनांक १४ ते २० मार्च, २०२३ या कालावधीत पुकारलेल्या बेमुदत संपानंतर माजी मुख्य सचिव सोबधकुमार यांच्या अध्यक्षतेखाली नेमलेल्या अभ्यास समितीला दिलेली तीन महिन्याची मुदत दिनांक १४ जून, २०२३ रोजी संपणार असून जुनी पेंशन समन्वय संघ यांच्या नेतृत्वाखाली दिनांक ३ मे, २०२३ रोजीपासून आझाद मैदान, मुंबई येथे बेमुदत आंदोलन केले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, दिनांक १ नोव्हेंबर, २००५ पूर्वी नेमणुक झालेल्या अनुदानित,विनाअनुदानित किंवा अनुदानित शिक्षण संस्थांवर व वस्ती शाळेवर जनसेवक म्हणून नेमणूक झालेल्या आणि अन्य विभागातील कर्मचारी अशा शिक्षक/शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची संख्या किती आहे, सदर योजना पूर्वलक्षी प्रभावाने लागू करणे, सेवानिवृत्त झालेल्या शिक्षक व कर्मचारी यांना पेंशन देण्याबाबत शासनाचे धोरण काय आहे,
(४) असल्यास, दिनांक १ नोव्हेंबर, २००५ पूर्वी सेवेत असलेल्या शिक्षकांचे जीपीएफ खाते सुरु असूनही हप्त्याची कपात बंद आहे तसेच शासनाने सन २००५ नंतर शासकीय, निमशासकीय सेवेत व नगरपालिका/महानगरपालिका व इतर अनुदानित शाळांमधील सोळा लाख दहा हजार शासकीय कर्मचारी तसेच सात लाख मान्यताप्राप्त रुजु झालेल्या शिक्षक कर्मचाऱ्यांना जुनी पेंशन योजना (ओपीएस) लागू न करता नवीन पेंशन योजना (एनपीएस) लागू करण्यात आली आहे, हे ही खर आहे काय,
(५) असल्यास, डीसीपीएसमधील जमा असलेली रक्कम अद्याप एनपीएस मध्ये वर्ग करण्यात आली नसल्यामुळे कोणताही हिशोब कर्मचाऱ्यांना संबंधित विभाग देत नसल्याचे, काही कर्मचाऱ्यांचे एनपीएस अकांऊटच सुरु झाले नसल्याचे, तसेच नगर पालिका / महानगरपालिका शाळेतील शिक्षक-शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना सहाव्या व सातव्या वेतन आयोगाचे हप्ते अपात्र असून सदर कर्मचाऱ्यांना DCPS/NPS खाते सुरू करण्यात आले नाही, हे ही खरे आहे काय,
(६) शालेय शिक्षण व क्रीडा विभागाच्य शासन निर्णयानुसार दिनांक ०१/११/२००५ रोजी व त्यानंतर राज्यातील जिल्हा परिषद, मान्यता प्राप्त खाजगी १००% अनुदानित प्राथमिक, माध्यमिक, उच्च माध्यमिक व अध्यापक विद्यालयातील १००% अनुदानित पदावरील शिक्षक / शिक्षकेतर कर्मचारी जो परिभाषित अंशदान निवृत्तीवेतन योजना / राष्ट्रीय निवृत्तीवेतन योजनेचा सदस्य आहे तसेच शिक्षक / शिक्षकेतर कर्मचाऱ्याचा सेवेत असताना मृत्यू झाल्यास त्याच्या कुटुंबाला कुटुंब निवृत्तिवेतन आणि मृत्यू उपदान, रुग्णता सेवानिवृत्त झालेल्या शिक्षक / शिक्षकेतर कर्मचाऱ्याला रुग्णता निवृत्तिवेतन आणि सेवानिवृत्ती उपदान लागू असून त्यानुसार कुटुंब निवृत्तिवेतनधारकास व रुग्णता निवृत्तिवेतनधारकास महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तिवेतन) नियम, १९८२ मधील तरतुदीप्रमाणे कुटुंब निवृत्तिवेतन / रुग्णता निवृत्तिवेतन लागू करण्याचे शासनाच्या विचाराधीन आहे, हे ही खर आहे काय,
(७) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने दिनांक १ नोव्हेंबर, २००५ पूर्वी व नंतरच्या शिक्षकांना जुनी पेंशन योजना लागू करुन समितीच्या अहवालातील शिफारशींच्या अनुषंगाने सेवानिवृत्त झालेल्या शिक्षक शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना सदर योजना पूर्वलक्षी प्रभावाने लागू करणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे. नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दादाजी भुसे (२७-१०-२०२५) :** (१) मा.सर्वोच्च न्यायालयात विशेष अनुमती याचिका प्रलंबित आहे.
(२) या अनुषंगाने सुधारीत राष्ट्रीय निवृत्तिवेतन योजना तसेच केंद्राच्या UPS लागू करण्याबाबतचा वित्त विभाग शासन निर्णय दिनांक २०/०९/२०२४ रोजी निर्गमित करण्यात आला आहे.
(३) वस्तीशाळा निमशिक्षकांना जिल्हा परिषद प्राथमिक शाळांमध्ये प्राथमिक शिक्षक म्हणून सेवेत सामावून घेणेबाबत शालेय शिक्षण विभाग, शासन निर्णय दिनांक ०१ मार्च २०१४ निर्गमित करण्यात आला आहे.

(४) वित्त विभागाच्या दिनांक ३१/१०/२००५ च्या शासन निर्णयान्वये राज्य शासनाच्या सेवेत दिनांक ०१/११/२००५ रोजी किंवा तद्नंतर नियुक्त होणाऱ्या कर्मचाऱ्यांसाठी वित्त विभागाच्या दिनांक ३१/१०/२००५ च्या शासन निर्णयान्वये राज्य शासनाच्या सेवेत दिनांक ०१/११/२००५ रोजी किंवा तद्नंतर नियुक्त होणाऱ्या कर्मचाऱ्यांसाठी परिभाषित अंशदान निवृत्तीवेतन योजना (DCPS) लागू करण्यात आली आहे.ही योजना मान्यता व अनुदानप्राप्त शैक्षणिक संस्था इत्यादींच्या सेवेमध्ये ०१ नोव्हेंबर २००५ रोजी किंवा त्यानंतर नियुक्त होणाऱ्या कर्मचाऱ्यांसाठी लागू आहे. या धर्तीवर शालेय शिक्षण विभागाने दिनांक २९/११/२०१० च्या शासन निर्णयान्वये मान्यता व अनुदान प्राप्त शैक्षणिक संस्थांच्या सेवेमधील दिनांक ०१ नोव्हेंबर, २००५ रोजी किंवा त्यानंतर नियुक्त होणाऱ्या शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांसाठी परिभाषित योजनेच्या अंमलबजावणीची विस्तृत कार्यपध्दती विहित केलेली आहे.

राज्य शासनाची परिभाषित अंशदान निवृत्तीवेतन योजना (DCPS) केंद्र शासनाच्या राष्ट्रीय निवृत्तीवेतन योजनेमध्ये (NPS) समाविष्ट करण्याबाबत वित्त विभागाने शासन निर्णय क्र.अंनियो २०१२/प्र.क्र.९६/सेवा ४, दिनांक २७/०८/२०१४ अन्वये आदेश दिले आहेत. त्याच धर्तीवर राज्यातील मान्यता प्राप्त खाजगी अनुदानित प्राथमिक, माध्यमिक, उच्च माध्यमिक व अध्यापक विद्यालयातील १००% अनुदानित पदावरील शिक्षक व शिक्षकेतर तसेच कर्मचाऱ्यांसाठी परिभाषित अंशदान निवृत्तीवेतन योजना केंद्र शासनाच्या राष्ट्रीय निवृत्तीवेतन योजनेमध्ये समाविष्ट करण्याची कार्यपध्दती शालेय शिक्षण विभागाच्या शासन निर्णय दिनांक १९/०९/२०१९ अन्वये विषद केली आहे.

(५) या अनुषंगाने कार्यवाही सुरु आहे. तसेच नगर पालिका / महानगरपालिका शाळेतील शिक्षक-शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या बाबतीत नगरविकास विभागामार्फत कार्यवाही सुरु आहे.

(६) या अनुषंगाने वित्त विभाग शासन निर्णय क्रमांक रानियो-२०२२/प्र.क्र.३४/सेवा- ४, दिनांक ३१ मार्च, २०२३ व शालेय शिक्षण व क्रीडा विभागाचा शासन निर्णय क्र. अंनियो-२०२३/प्र.क्र.२८/टिएनटी-६,दिनांक १४ जून २०२३ रोजी निर्गमित करण्यात आला आहे.

(७) वरीलप्रमाणे.

---

## महाराष्ट्र राज्य मुक्त विद्यालयाचे बनावट प्रवेशपत्र व प्रमाणपत्र प्रकरणी दोषींवर कारवाई करणेबाबत

**(१६) १९२८६ (०४-०८-२०२३) श्री.एकनाथराव खडसे :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र राज्य मुक्त विद्यालयाचे बनावट प्रवेशासह बनावट प्रमाणपत्र ५०-६० हजार रुपयांमध्ये मिळवून देण्याचा प्रकार छत्रपती संभाजी नगर, सांगली येथे घडल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास,उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने बनावट प्रमाणपत्र मिळवून देणाऱ्या संबंधित दोषींविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दादाजी भुसे (१३-१०-२०२५) :** (१) अंशत: खरे आहे.

महाराष्ट्र राज्य मुक्त विद्यालय मंडळामार्फत राज्यातील शिक्षणाच्या प्रवाहाबाहेर असलेल्या व्यक्तींना शिक्षणाची संधी प्राप्त व्हावी म्हणून केवळ इ. ५ वी आणि इ. ८ वी साठी प्रवेश दिला जातो. इ. १०/१२ वी साठी राज्य मुक्त विद्यालयामार्फत प्रवेश दिला जात नाही. अथवा परीक्षा घेतली जात नाही.

(२) पुणे पोलीस आयुक्तालय अंतर्गत स्वारगेट पोलीस स्टेशन येथे गुन्हा रजिस्टर क्रमांक १०७/२०२२ भा.द.वि कलम ४२०, ४६५, ४६८, ४७१, ३४ तसेच माहिती तंत्रज्ञान अधिनियम २०१० मधील अमेडमेंड चे कलम ६५,६६(अ), (क), (ई) अंतर्गत गुन्हा नोंद केलेला आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्यातील आयसीटी शिक्षकांना सेवेत सामावून घेण्याबाबत

**(१७) १९३५१ (०४-०८-२०२३) श्री.ज्ञानेश्वर म्हात्रे :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) देशातील इतर राज्यांप्रमाणे महाराष्ट्रातील कंत्राटी पध्दतीने नियुक्त आयसीटी शिक्षक, उर्दु शाळांमधील मानसेवी शिक्षक आणि विशेष तज्ज्ञ साधन व्यक्ति शिक्षक यांना पूर्ववेळ माध्यमिक शिक्षकांचा दर्जा देऊन शासकीय व निमशासकीय सेवेत कायम करून नियमित वेतन देण्याची मागणी संबंधित संघटनांकडून सातत्याने मागणी होत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, आयसीटी योजना सन २००८ पासून सुरू झाली सदर योजनेमध्ये तीन टप्पे केले होते प्रत्येक टप्प्यात समाविष्ट केलेल्या शाळांची संख्या पुढीलप्रमाणे होती ५०० शाळा, २५०० शाळा आणि ५००० शाळा, दुसरा टप्पा २०११ साली व तिसरा टप्पा २०१३-१४ मध्ये सुरू झाला हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर योजनेसाठी निविदा प्रक्रियेव्दारे तीन ऑपरेटरची नियुक्ती विभागनिहाय करण्यात आली होती शासनाने सदर योजना सुरू करतानाच प्रति शाळा पाच वर्षासाठी १२.५८ लक्ष एवढी तरतूद करण्यात आली असून पाच वर्षांनंतर योजना बंद झाल्याने आयसीटी संगणक निर्देशक यांच्या सेवा आपोआपच समाप्त झाल्याने मानधन बंद झाले,त्यांचा करार खाजगी ऑपरेटरशी असल्यामुळे अन्य प्रश्न निर्माण झाले आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, शाळेत असलेले संगणक, त्यासाठी बांधलेली खोली (संगणक लॅब), उपलब्ध साधनसामुग्री आज देखील तशीच पडून आहे परंतु शिकवण्यासाठी आयसीटी शिक्षक नाही, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने महाराष्ट्रातील कंत्राटी पध्दतीने नियुक्त आयसीटी शिक्षक, उर्दु शाळांमधील मानसेवी शिक्षक आणि विशेष तज्ज्ञ साधन व्यक्ति शिक्षक यांना पूर्ववेळ माध्यमिक शिक्षकांचा दर्जा देऊन शासकीय व निमशासकीय सेवेत कायम करून नियमित वेतन देण्याबाबत तसेच आयसीटी शिक्षकांना अनुदान उपलब्ध करुन देऊन या शिक्षकांना सेवेत सामावून घेण्याबाबत कोणती कार्यवाही केली तसेच सदर योजना कार्यान्वित करण्याबाबत शासनाचे धोरण काय आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दादाजी भुसे (३१-१०-२०२५) :** (१) हे अंशत: खरे आहे.

(२) व (३) केंद्र शासनाकडून सन २००७-०८ मध्ये ५०० शाळा, सन २००८-०९ मध्ये २५०० व सन २०११-१२ मध्ये ४६१८ शाळा याप्रमाणे टप्पा १ ते ३ मध्ये ७६१८ आयसीटी शाळांमध्ये निविदा प्रक्रियेअंती निवड करण्यात आलेल्या पुरवठादारामार्फत निर्देशक उपलब्ध करून दिलेले आहेत. याकरीता केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सुचनांनुसार ५ वर्षांकरीता निधी उपलब्ध करून देण्यात आला आहे.

(४) हे खरे नाही.

(५) केंद्र पुरस्कृत आयसीटी योजना राज्यातील ५०० शाळांमध्ये BOOT (Built Own Operate & Transfer) मॉडेल पध्दतीने ५ वर्षांसाठी कार्यान्वित करण्यात आली असल्याने राज्यातील आयसीटी शिक्षक बाह्य यंत्रणेमार्फत घेण्यात आलेले आहेत.

तसेच, वित्त विभाग, शासन निर्णय दिनांक २७/०४/२०२२ अन्वये बाह्ययंत्रणेमार्फत कामे करून घेण्यासाठी कंपनी/ संस्थेसोबत करार करण्यात येऊन अधिकारी/ कर्मचारी यांचे कोणतेही उत्तरदायित्व शासनावर येणार नाही, अशा सुचना देण्यात आलेल्या असल्याने आयसीटी शिक्षकांना सेवेत सामावून घेता येणार नाही.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## विनाअनुदानित ते अनुदानित पदावरील बदलीला पुढील आदेश होईपर्यंत स्थगितीचा शासन निर्णय रद्द करण्याबाबत

**(१८) २०३०८ (०४-०८-२०२३) श्री.सुधाकर अडबाले : तारांकित प्रश्न क्रमांक १७५४८ ला दिनांक २७ फेब्रुवारी, २०२३ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) १ एप्रिल २०२१ रोजीच्या शासन निर्णयान्वये राज्यातील सर्वच अनुदानित शाळेतील रिक्त पदांवरती विनाअनुदानित पदावर काम करणाऱ्या शिक्षकांची बदली करण्याचा निर्णय घेण्यात आला होता.परंतु, या शासन निर्णयावर १ डिसेंबर २०२२ च्या शासन परिपत्रकांन्वये विनाअनुदानित ते अनुदानित पदावरील बदलीला पुढील आदेश होईपर्यंत स्थगिती देण्यात आली असल्याचे माहे जून, २०२३ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, विनाअनुदानित पदावर गेल्या १० ते १२ वर्षांपासून काम करणाऱ्या शिक्षकांवर हा मोठा अन्याय आहे. त्यामुळे १ डिसेंबर २०२२ चा शासन निर्णय रद्द करण्यात यावा, यासाठी राज्यभरातील शिक्षक संघटनांनी मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनपरिपत्रक दिनांक ०१ डिसेंबर, २०२२ अन्वये दिनांक ८ जून, २०२० रोजीच्या अधिसूचनेतील तरतूदीस स्थगिती देण्यात आली असूनही सदर परिपत्रकान्वये आयुक्त (शिक्षण) यांना अहवाल सादर करण्याचे सूचित केले आहे आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने आयुक्त (शिक्षण) यांना सादर करण्यात आलेल्या अहवालाच्या शिफारशींच्या अनुषंगाने तसेच दिनांक १ डिसेंबर, २०२२ चा शासन निर्णय रद्द करून १० ते १२ वर्षांपासून विनाअनुदानित पदावर काम करणाऱ्या शिक्षकांवरील अन्याय दूर करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दादाजी भुसे (२२-०९-२०२५) :** (१), (२) व (३) होय, हे खरे आहे.
(४) सद्य:स्थितीत बदल्यांबाबतचे अधिकार शासनाकडे घेण्याबाबतच्या दिनांक २९/०४/२०२४ च्या शासन निर्णयास मा.न्यायालयाने स्थगिती दिली असून, महाराष्ट्र खाजगी शाळांतील कर्मचारी (सेवेच्या शर्ती) नियमावली, १९८१ मधील नियम ४१-अ मधील तरतूदीनुसार तपासून निर्णय घ्यावा, असे सक्षम प्राधिकाऱ्यांस आदेशित केले आहे. त्यानुसार नियमात अंतिमत: बदल होत नाही तोपर्यंत नियम ४१-अ मधील तरतूदीनुसार प्रस्ताव तपासून सक्षम प्राधिकारी निर्णय घेऊ शकतात.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यात शिक्षकांच्या रिक्त जागा भरण्याबाबत विविध शिक्षक संघटनांनी कोल्हापूर जिल्हाधिकारी कार्यालयावर मोर्चा काढल्याबाबत

**(१९) २०६१९ (०४-०८-२०२३) श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, ॲड.निरंजन डावखरे, श्रीमती उमा खापरे :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात जून, २०२३ पूर्वी शिक्षकांच्या रिक्त असलेल्या ५० हजार जागा भरण्याबाबत विविध शिक्षक संघटनांनी कोल्हापूर जिल्हाधिकारी कार्यालयावर मोर्चा काढण्यात आला असल्याचे माहे, एप्रिल,२०२३ च्या दुसऱ्या आठवड्यात वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या निवेदनात माहे जून, २०२३ पूर्वी शिक्षकांच्या सर्व ५० हजार रिक्त जागा भरणे, नवीन शैक्षणिक धोरणातील डी. एड. कॉलेज बंद करण्याची तरतूद रद्द करणे, शिक्षक पदांचे कंत्राटीकरण थांबवणे यासह अन्य मागण्या केल्या असून ५०० पेक्षा जास्त कॉलेजांमधून हजारो विद्यार्थी शिक्षण घेत असून लाखो विद्यार्थी पदविका घेऊन नोकरीच्या प्रतीक्षेत असल्याने त्यांना न्याय देण्याची मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले तदनुषंगाने शिक्षकांची माहे जून, २०२३ पूर्वी पदे भरण्याबाबत तसेच इतर मागण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दादाजी भुसे (१९-०९-२०२५) :** (१), (२) व (३) डीएड/बीएड पदविकाधारक उमेदवार व विविध संघटना यांचे वतीने राज्यात शिक्षकांची मोठ्या प्रमाणात पदे भरण्यात यावी, या मागणीच्या अनुषंगाने सन २०२२ पासून विविध ठिकाणी आंदोलने झालेली आहेत. तसेच याबाबत मागणीच्या अनुषंगाने शासनास देखील निवेदने प्राप्त झालेली आहेत.

सद्य:स्थितीत शिक्षक अभियोग्यता व बुध्दीमत्ता चाचणी २०२२ च्या आधारे बिंदुनामावली बाबत प्राप्त तक्रारींचे निराकरण करण्याकरीता काही अवधी बिंदूनामावली अद्ययावत करण्याकरीता लागला. तद्नंतर अद्ययावत बिंदूनामावलीच्या आधारे पहिल्या टप्प्यात मुलाखतीसह व मुलाखतीशिवाय अशी एकूण २१,८३९ पदांची जाहीरात प्रसिध्द झाली. त्यानुसार १८,०३४ उमेदवारांची शिफारस करण्यात आली आहे.

तसेच दूसऱ्या टप्प्यामध्ये सुमारे १०,००० शिक्षकीय पदे भरण्याची कार्यवाही करण्यात येत आहे. त्याचप्रमाणे शिक्षक भरती प्रक्रियेमध्ये खंड पडू नये यास्तव शिक्षक अभियोग्यता व बुध्दीमत्ता चाचणी २०२५ घेण्यात आली असून, त्याचा निकाल प्रसिध्द करण्यात आला आहे. त्यामधील प्राप्त गुणांकनानुसार शिक्षक भरतीबाबतची पुढील कार्यवाही करण्यात येत आहे. त्यामुळे शिक्षकांअभावी विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होऊ नये, यास्तव रिक्त शिक्षक पदे भरणेबाबत शासन प्रयत्नशील आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## मंगळवेढा व सांगोला (जि.सोलापूर) तालुक्यातील चारा छावण्यांची देयके प्रलंबित असल्याबाबत

**(२०) २२०१३ (०४-०१-२०२४) श्री.प्रविण दरेकर, श्रीमती उमा खापरे, श्री.रणजितसिंह मोहिते-पाटील : तारांकित प्रश्न क्रमांक १५८७५ ला दिनांक २८ डिसेंबर, २०२२ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मंगळवेढा व सांगोला (जि.सोलापूर) तालुक्यातील गेल्या पाच वर्षापासून चारा छावण्यांची देयके शासनाकडे प्रलंबित असल्याने चारा छावणी चालकांनी तहसिल कार्यालयासमोर बेमुदत धरणे आंदोलन केले असल्याची बाब माहे ऑगस्ट २०२३ च्या तिसऱ्या आठवड्यात वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या चारा छावणी चालकांची देयके अदा करण्यास विलंब करणाऱ्या अधिकाऱ्यांवर कोणती कार्यवाही केली तसेच देयके तात्काळ अदा करण्यासाठी सुधारीत प्रस्ताव सादर करण्यात आला आहे काय, त्यानुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.मकरंद जाधव (पाटील) (३०-०७-२०२५) :** (१) हे खरे आहे.
(२) माहे एप्रिल, २०१९ ते ऑक्टोबर, २०१९ या कालावधीमधील मंगळवेढा व सांगोला तालुक्यातील चारा छावण्यांची प्रलंबित देयके अदा करण्याबाबतचा प्रस्ताव राज्य आपत्ती प्रतिसाद निधीच्या (SDRF) मार्गदर्शक सूचनांनुसार राज्य कार्यकारी समितीच्या मान्यतेकरीता दिनांक ६/०९/२०२२ रोजीच्या बैठकीत सादर करण्यात आला होता.सदर बैठकीत राज्य कार्यकारी समितीने सुधारित प्रस्ताव सादर करण्याचे निर्देश दिलेले होते. दरम्यान, सदर विषयाच्या अनुषंगाने दिनांक ११/१०/२०२३ रोजी तत्कालिन मंत्री महोदयांनी बैठक घेतली. सदर बैठकीत तत्कालीन मंत्री महोदयांनी, नैसर्गिक न्यायाच्या दृष्टीने सोलापूर जिल्ह्यातील चारा छावणी चालकांना त्यांचे म्हणणे मांडण्यासाठी आणि आवश्यक त्रुटींची पूर्तता करण्यासाठी संधी देणे गरजेचे असून त्याकरीता विभागीय आयुक्त, पुणे यांच्या कार्यालयातील किमान उपायुक्त यांच्या स्तरावरील अधिकाऱ्याकडे सर्व संबंधित चारा छावणी चालकांची सुनावणी आयोजित करुन राज्य कार्यकारी समितीच्या निर्णयानुसार पात्र चारा छावण्यांच्या निधी मागणीचा सुधारित प्रस्ताव शासनास पाठविण्यात यावा, असे निर्देश दिले होते. यानुसार, विभागीय आयुक्त, पुणे यांच्या कार्यालयाकडून प्राप्त झालेल्या

प्रस्तावास मंत्रिमंडळ उपसमितीने दिनांक १/०७/२०२४ रोजीच्या बैठकीत मान्यता दिलेली आहे. सदर प्रस्ताव SDRF च्या मार्गदर्शक सूचनांनुसार, राज्य कार्यकारी समितीच्या दिनांक २५/०३/२०२५ रोजीच्या बैठकीत निर्णयार्थ सादर करण्यात आला होता.सदर प्रस्ताव पूनश्च: राज्य कार्यकारी समितीस निर्णयार्थ सादर केला आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**विधान भवन :**
**नागपूर.**

**डॉ. विलास आठवले**
**सचिव-३,**
**महाराष्ट्र विधानपरिषद.**

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर करण्यात आली आहे.
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, नागपूर.